



...राराणी विद्यापीठातर्फे भारतीय जनता पक्षाच्या उपाध्यक्षा खासदार विजयाराजे शिंदे यांना कुलगुरु डॉ. के. बी. पवार यांच्याहस्ते 'भद्रकाली ताराराणी पुरस्कार' मंगळवारी प्र...
...ी. व्ही. टी. पाटील, डॉ. डी. वाय. पाटील उपस्थित होते. या समारंभाच्यावेळी श्रीमती शिंदे यांच्या निषेधार्थ निदर्शने करणाऱ्यांना पोलिसांनी अडविले.

# सतिप्रथेचे नव्हे, सतिपूजेचे समर्थन : शिंदे

कोल्हापूर : एक हिंदु महिला म्हणून आपण सति प्रथेचे समर्थन कधीच केलेले नाही, कधी करणारहि नाही. मात्र पूजा या मानवी अधिकाराचा अवमान सहन केला जाणार नाही. अशी आपली भूमिका आहे म्हणूनच सतिमंदिरात होणाऱ्या पूजेचे समर्थन मी काय करीन अशी स्पष्टोक्ती भारतीय जनता पक्षाच्या उपाध्यक्षा खा. व ग्वाल्हेरच्या राजमाता विजयाराजे शिंदे यांनी मंगळवारी पत्रकारपरिषदेत केली.

डाव्या व लोकशाहीवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी राजमाता शिंदे यांच्या कोल्हापूर दौऱ्यात केलेल्या निदर्शनांच्या पार्श्वभूमीवर काल पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना श्रीमती शिंदे म्हणाल्या की

सति प्रथेचे समर्थक करण्याइतकी मी नादान नाही. कोणीहि महिला किंवा माणूस एखादा पुरुष मेल्यानंतर त्याच्या पत्नीने मयत पतीच्याचितेवर स्वतःला जाळून घ्यावे असे म्हणण्याइतका क्रूर निश्चितच नाही. सतीची परंपरा निश्चितपणाने मोडित काढली पाहिजे याच मताची मी आहे. माझ्यावर केले जाणारे आरोप माझ्या विधानांचे वेगळे अर्थ काढून केले जात आहेत. सती प्रथेचे नव्हे तर सतीच्या मंदिरात होणाऱ्या पूजेविरुद्ध शासकीय कारवाई होऊ लागली तेव्हा आपल्या आदरस्थानांबद्दल आदर बाळगणे व त्यांची पूजा करणे या मानवी हक्काला मूठमाती दिली जात असल्यामुळे मी या पूजेचे समर्थन केले आहे. ते कायम करीन. हे समर्थन करताना पूजा रोखली गेल्यास त्याविरुद्ध आंदोलन करणारी मी पहिली महिला असेन असे म्हटले होते. आजहि तेच माझे विधान मी कायम ठेवते.

सति म्हणजे आपल्याला नवऱ्याच्या चितेवर उडी घेणारी महिला असा अर्थ अपेक्षित नाही. शिवाय हा अर्थ पूर्णतः चुकीचा आहे. कारण सतीची प्रथा ब्रिटिशांच्या कायद्यातून पळवाट काढण्यातून रुजविली गेली आणि सति या शब्दाला वेगळा अर्थ प्राप्त झाला. या शब्दाचा मूळ किंवा मला अभिप्रेत असलेला अर्थ म्हणजे जिच्या विषयी आदर्श बाळगावा अशी महान महिला असाच अर्थ आहे. या शब्दाच्या विकृत अर्थाने जी प्रथा रुजविली गेली ती मोडून काढायची असेल तर सरकारने कायद्याचा योग्य वापर केला पाहिजे असे एका प्रश्नाला अतिशय संतप्त होऊन त्यांनी उत्तर दिले व त्या म्हणाल्या, की,

(पुढील मजकूर पान ७ वर)

दै. केसरी दि. ५-१२-९० पान - ८

# ताराराणी या देशाच्या आदर्श

(पान १ वरून)

सभेत व मोर्च्यातील घोषणात श्री. पाटील यांच्या कारभाराची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली. तसेच हा पुरस्कार श्रीमती शिंदे यांना दिल्याबद्दल ताराराणी विद्यापीठासमोर नजिकच्या काळात योजनाबद्ध आखणीने परत निदर्शने करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. सभेत कम्युनिस्ट नेते गोविंद पानसरे, नगरसेविका पद्मा तिवले, प्रा. सौ. आशा कुकडे, शेतकरी कामगार पक्षाचे नेते प्रा. विष्णुपंत इंगवले, सुरेश शिपुरकर व इतरांची भाषणे झाली.

या तणावपूर्ण वातावरणात ताराराणी विद्यापीठाच्या आवारात श्रीमती शिंदे यांनी भद्रकाली ताराराणी पुरस्कार व मानपत्र स्वीकारले. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के. बी. पवार यांच्या अध्यक्षतेखाली ११ हजार रुपये रोख व

त्या म्हणाल्या की, माणसाच्या आत्मविश्वासावर माणूस प्रगति करू शकतो म्हणून आपण प्रथम स्वतःवर विश्वास ठेवायला शिकले पाहिजे. स्वतःशी प्रामाणिक राहिले पाहिजे, अशा वर्तनातूनच कितपत प्रगति करता येते याचे ज्वलंत उदाहरण ताराराणी आहेत. स्वतःवर विश्वास ठेवण्यातूनच स्वाभिमान जागा होतो आणि त्यातूनच भावी काळातील यश संपादन करता येते हेच ताराराणींचे जीवनचरित्र आहे. केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर देशालाहि त्या आदर्श ठरल्या आहेत.

विद्यार्थ्यांनी राजकारणापासून अलिप्त राहावे, असे आपले मत असल्याचे सांगून त्या म्हणाल्या की, कोणत्याहि राजकीय पक्षाशी संबंधित होण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी चांगले काय आणि वाईट काय याची परीक्षा करणे शिकले पाहिजे.